# प्रकरण - तिसरे

# दि. तळोदे तालुका सह. खरेदी-विक्री संघ. मर्या.

## संस्थेची रचना

## (Structure of Talode Taluka Co-operative Sangh)

३.१. दि. तळोदे तालुका कॉटन सेल सोसायटी लि. चे तळोदा तालुका सह. खरेदी-विक्री मर्या. संघात रुपांतर

३.२. तळोदे तालुका सह खरेदी विक्री संघ मर्या. संस्थेचे उद्देश

३.३. सभासदत्व

३.४. पंचसमिती विषयक नियम

३.५. इमारत

# प्रकरण – तिसरे

# तळोदे तालुका सह. खरेदी–विक्री संघ. मर्या.

# संस्थेची रचना

## ३.१. दि. तळोदे तालुका कॉटन सेल सोसायटी लि. खरेदी विक्रीत रूपांतर :–

**(Transformation of Talode Taluka Cotton Sell Society Ltd. into Talode Taluka Co-Operative Sangh )**

तळोदे तालुक्यातील शेतकरी वर्ग काही प्रमाणात आखुड धाग्यांचे उत्पादन करीत असत परंतु, हा कापूस कापड उत्पादनासाठी फारसा उपयुक्त ठरत नसे. या भागातील शेतकरी वर्गांना आपल्या शेतात लांब धाग्याचा कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणावर घ्यावे व या कापसाला बाजारपेठेत चांगली किमंत मिळवून देण्यासाठी ब्रिटीश शासनाने येथील स्थानिक शेतकऱ्यांना प्रेरणा, प्रोत्साहन व मार्गदर्शन करून व शेतकऱ्यांचा मदतीने दि. ५/११/१९४३ रोजी दि. तळोदे तालुका को. ऑप. कॉटन सेल सो.लि. या शेतकऱ्यांच्या संस्थेची रितसर स्थापना केली. स्थापनेच्या वेळी या संस्थेचे एकमेव उद्देश सभासदांचा कापूस एकत्र करून शक्य तेवढया जास्तीत जास्त किमंतीने आणि कमीत कमी खर्चात विकणे व सरासरी भावाने सभासदांना कापसाचे पैसे देणे हा होता.

या संस्थेच्या सभासदांनी १९४३ मध्ये आपल्या शेतात लांब धाग्याच्या कापसाचा पेरा केला. परंतु अतिवृष्टीमुळे लांब धाग्याचा कापसाचे उत्पादन होवू शकले नाही. व या संस्थेला सभासदांची संस्था करण्याची सुवर्ण संधी मिळू शकली नाही. या भागात पाऊसाचे प्रमाण जास्त आहे त्यामुळे लांब धाग्याचा कापसाचे उत्पादन होवू शकणार नाही अशी खात्री सभासद व पंचसमितीची झाली. दि. तळोदा तालुका को. ऑप. कॉटन सेल लि. या संस्थेच्या विसर्जन न करता या संस्थेचे रूपांतर दि.

तळोदे तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ मर्या. या संस्थेत करावे असे दि. २४ ऑगस्ट १९४५ रोजी झालेल्या दि. तळोदा तालुका को. ऑप कॉटन सेल सो. लि. या संस्थेच्या सभासदांच्या दुसऱ्या वार्षिक सभेत सर्वानुमते खालील कारणास्तव ठरले.

१) दि. तळोदे तालुका को. ऑप कॉटन सेल सो. लि. संस्थेचा उद्देश भविष्यात फारसा यशस्वी होणार नाही.

२) शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या शेतमालाला बाजारपेठेत रास्त किमंत मिळावी हयासाठी संघाची स्थापना होणे अत्यावश्यक आहे.

३) सोसायटीचे नाव कॉटन सेल असल्याने सोसायटीला नियंत्रित वस्तुचे वाटप करता येत नव्हते. नियंत्रित वस्तुचे वाटप करण्यासाठी सोसायटी नाव बदलणे क्रमप्राप्त होते.

४) शेतकऱ्यांना वाजवी दरात शेती उपयुक्त वस्तुचा पुरवठा करता यावा हया करिता.

५) व्यापारी वर्गाकडून शेतकऱ्यांची बाजारपेठेत हिशेब, वजन व किमंत हया बाबत फसवणूक होत असे ही फसवणूक होऊ नये ह्यासाठी संघ स्थापन करणे आवश्यक आहे.

६) प्रत्येक तालुक्यात एक खरेदी-विक्री संघ असावा असे त्यावेळी शासनाचे धोरण होते. या धोरणांची अमंलबजावणी व्हावी यासाठी.

## ३.२. तळोदे तालुका सह खरेदी-विक्री संघ मर्या. संस्थेचे उद्देश - (Objectives of Talode Taluka Co-Operative Sangh)

संघाची स्थापना खालील उद्देश डोळ्यासमोर ठेवून झालेली आहे.

१) सदस्यांमध्ये बचत, काटकसर, स्वालंबन व सहकार यांचा प्रसार करणे.

२) भांडवल उभारणे.

अ) भागांचा रूपाने

i) सदस्याकडून

ii) सरकाराकडून –(जिल्हा मध्यवर्ती सह. बँक)

ब) ठेवीच्या रूपाने – (सदस्यांकडून)

क) कर्जाच्या रूपाने

ड) देणगीच्या व अनुदानाच्या रूपाने

इ) प्रवेश फी च्या रूपाने

३) मे. नोंदणी अधिकारी यांचे अगाऊ परवानगीने जागा, इमारत, यंत्रसामुग्री, मशिनरी व इतर जरूर ती साधने विकत अगर भाड्याने घेणे, उभारणे, बांधणे अगर दुरूस्त करणे तसेच माल साठविण्याकरिता गुदाम बांधणे खरेदी अगर भाड्याने घेणे.

४) सदस्य व बिगर सदस्यांकडून तयार झालेला शेतीचा विक्री लायक माल तसेच भाजीपाला फळफळावळ इ. स्विकारणे त्यांची होईल तितक्या कमी खर्चात आणि किफायतशीर रितीने व कसोशीने स्थानिक बाजारपेठेत विक्री करणे. अगर योग्य भाव मिळविण्यासाठी परपेठेत त्यांची विक्री करणे अगर विक्रीसाठी तो माल पाठविणे शक्य असेल तर मालाची प्रतवारी करून तो विकणे.

५) विक्री करावायाचा मालाचे पेठेतील भाव अवाजवी रितीने खाली गेल्यास पेठेतील भाव व जाण्याचे दृष्टीने व उत्पादकांना मालाचा योग्य मोबदला मिळण्याचा दृष्टीने पेठेत आलेल्या शेती विक्री लायक माल जरूरीचा प्रसंगी खरेदी करणे मात्र अश्या खरेदीची मर्यादा, संघाचे भाग भांडवल, राखीव व इतर निधी (फंडस्) यांचा बेरजेच्या दोन पटी पर्यंत राहील. काही विशिष्ट प्रसंगी मे. नोंदणी अधिकारी यांचा आगाऊ परवानगीने ही मर्यादा तीन पटी पर्यंत वाढविता येईल.

६) विक्री करिता आलेल्या मालावर प्रक्रिया करून तो माल विकल्यास जास्त किमंत येत असेल तर त्या मालावर जरूर त्या प्रक्रिया करून त्या मालाची विक्री करणे.

७) स्थानिक मोठया बाजारपेठातील दैनंदिन बाजार भाव, सुधारीत शेती व उत्पादन वाढ याविषयी कार्यक्षेत्रातील उत्पादक व विक्रेतांना वेळोवेळी माहीती पुरविणे व मालाची खरेदी विक्री बाबत त्यांना योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.

८) उत्पादन वाढीच्या दृष्टीने शेती करिता लागणारे सुधारलेली खते, बि-बियाणे व औषधे यांचा शेतकऱ्यांना व त्यांच्या सहकारी संस्थाना योग्य भावाने पुरवठा करणे. त्या कारणाकरिता योग्य व जरूर तितका माल घेवून त्याचा साठा करणे.

९) मिश्र खते तयार करणे व त्यांची विक्री करणे.

१०) शेती उत्पादन वाढविण्याकरिता शेतकरी सभासदांचे मागणी प्रमाणे व त्यांचा जबाबदारीवर इंजिने , पंपींग सेट्स, मशनरी, नांगर,ट्रॅक्टर, सुधारलेली औते, हत्यारे, अवजारे व यंत्रे यांचा अभीकर्ता (एजेंट) या नाताने पुरवठा करणे तसेच त्यांचे सुटे भाग व इंजिने इत्यादींना लागणारी तेले व इतर जरूर ती साधने पुरविणे. या कारणाकरिता त्यांच्या योग्य व जरूर तितका साठा करणे.

११) शेती करिता लागणारी औजारे व त्यांचे सुटे भाग, हत्यारे तयार करणे व त्यांची विक्री करणे.

१२) उत्पादन वाढीकरीता सदस्यांच्या उत्पादीत माल गोळा करणे व त्यांची वहातुकीची व्यवस्था करणे.

१३) विक्री करण्याकरिता सदस्यांचा उत्पादित माल गोळा करणे व त्यांची वहातुकीची व्यवस्था करणे.

१४) विक्री करिता आलेल्या मालाच्या तारणावर चालु बाजारभाव विचारात घेवून आगाऊ रक्कमा (ॲडव्हान्सेस) देणे. विक्री करावयाचा मालाचे उत्पादनासाठी दुसऱ्या सहकारी कर्जपुरवठा संस्थेकडून एखादया सदस्यांने कर्ज घेतले असल्यास त्या संस्थेच्या विचाराणे त्यास अश्या अगाऊ रक्कमा देणे.

१५) शेती व इतर तत्सम धंदयातील नविन आधुनिक पध्दतीचा सुधारणा विषयक ज्ञानाचा सदस्यामध्ये प्रसार करणे व त्या सुधारणा अमंलात आणण्याकरिता संदस्यांना उत्तेजन देवून चांगले व निर्भेळ उत्पादन वाढविणे.

१६) संघासाठी व्यवस्थापक तसेच धंद्यातील तंत्र व इतर जरूर ते सेवक कामगार नेमणे त्यांचे निंयत्रण करणे व जरूरी नुसार त्यांना कमी करणे.

## ३.३. सभासदत्व (Membership) :-

संघाच्या सभासद होण्यासाठी खालील मार्गाचा अवलंब करावा लागतो.

### *१) सभासदत्व प्राप्तीसाठी अट :-*

संघाचे सभासदत्व सर्व लोकांना मिळावे ह्यासाठी स्थापनेच्या वेळी सभासद होण्याचे खालील नियम किंवा अटी निश्चित करण्यात आल्यात या अटी पूर्ण झाल्या खेरीज कोणत्याही इसमास सभासद होता येणार नाही असे पोट नियमात निश्चित करण्यात आले.

अ) तो तळोदे तालुक्याच्या हद्दीतील रहिवासी असला पाहीजे.

ब) त्याचा सभासद होण्याबद्दलच्या लेखी अर्ज व्यवस्थापक कमिटीतील सभासदांचा बहुमताने मंजुर झाला पाहिजे.

क) त्यांने रूपये ५/- प्रवेश फी दिली पाहिजे.

ड) त्याने निदान ५०/- दर्शनी किमंतीचे दहा भाग खरेदी करून किमंत दिली असली पाहीजे.

इ) तो पूर्ण १८ वर्ष वयाचा व करार करण्यास पात्र असला पाहिजे.

ई) आर्थिक अफरातफर प्रकरणात गुन्हेगार ठरलेला नसला पाहिजे.

उ) सभासदत्व प्राप्त करून घेणारी व्यक्ती मानसिक दृष्टया वेडी नसावी.

## २) सभासदत्व कमी करणे साठी नियम व कार्यपध्दत :-

या संस्थेचे सभासदत्व प्राप्त करण्यासाठी महत्वपूर्ण अटी निश्चित करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे संस्थेतुन सभासदांचे सभासदत्व रद्द करण्याचे अधिकार संस्थेला प्राप्त झालेले आहे. त्या संदर्भातील सविस्तर नियम खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे.

अ) सभासदाने आपला सर्व माल संघामार्फतच विकला पाहिजे तसा विकला नाही अशी पंच समितीने खात्री झाली तर दुसरीकडे विकला गेलेल्या मालाची होणारी अडत रक्कम तो संस्थेस देण्यास पात्र राहील.

व्यवस्थापक यास तीन महिन्याची नोटीस देऊन कोणीही सभासदास आपले नांव काढून घेता येईल. मात्र तसे करण्यापुर्वी त्यांचेकडून येणे असलेल्या रक्कमांची व्याजासहित पूर्ण फेड झाली पाहिजे. व जामिनकीच्या सदर अंगीकारलेल्या जबाबदारीतुन मुक्त झाला पाहिजे.

ब) साधारण सभेत हजर असलेल्या सभासदांच्या २/३ सभासदांच्या मताने कोणाही इसमास खालील पैकी कोणत्याही कारणाकरिता संघातुन काढून टाकता येईल.

i) जर तो नेहमी बाकी थकविणारा असेल किंवा संघाच्या सभासद ह्या नात्याने त्यांची असलेली कर्तव्ये बजावण्यास तो नेहमी चुकत असेल तर

ii) जर तो खोटे सांगून संघास जाणूनबुजून फसवीत असेल तर

iii) जर तो दिवाळखोर अगर कायद्याने नालायक ठरविला गेला असेल तर

iv) जर त्यांचेवर अनैतिक स्वरूपाच्या फौजदारी गुन्हंयाची शाबिती झाली असेल तर

v) जर तो संघाचा पतीस धक्का पोचवत असेल तर असे कृत्य बुध्दी पुरस्कर करीत असेल तर

पंच समितीने अशा सभासदास काढून टाकण्याबद्दलच्या ठरावाची चौदा दिवसाची लेखी नोटीस दिली पाहीजे. सभासदास काढुन टाकतांना त्यांचे असलेले सर्व अगर काही भागही जप्त करता येतील.

क) एखाद्या व्यक्तीचे सभासदत्व खालील कारणामुळे कमी होईल.

i) मरणामुळे

ii) संघाच्या कार्यक्षेत्रात नेहमी राहण्याचे त्याने सोडल्यास.

iii) नांवावर एकही भाग राहिला नाही असे झाल्यास

iv) कायम वेडा झाल्यास

v) पोटनियम नं. ६ प्रमाणे तीन महिन्यांची नोटीस देऊन सभासदत्व काढून घेतल्यास

vi) पोटनियम नं. ७ प्रमाणे काढुन टाकल्यास

vii) जर त्यांचे कडील येणे लवाद निवडा बजावणी करून वसुल केले असल्यास.

viii) संघाचे बाबतीत नोंद रद्द झाली असल्यास.

वरील सर्व सभासद होण्याकरिता अटी हया दि. २४ ऑगस्ट १९४५ नंतर सभासदांसाठी लागु करण्यात आल्यात.

## ३.४ . पंचसमिती विषयक नियम :-
**(Rules Regarding Managing Board)**

तळोदे तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाचा पंचसमितीचे नियम खालील प्रमाणे-

१) इतर पोटनियमात काहीही नमुद असले तरी ज्या सभासदाकडे संघाची अगर दुसऱ्या एखाद्या सोसायटीची बाकी अनाधिकाराने थकली असेल त्यास संघामध्ये अधिकाराचा जागे करिता निवडणूकीस उभे राहता येणार नाही.

२) पंचसमितीने आपल्यापैकी एकाच आपल्या कामाच्या मुदतीत चेअरमन निवडले पाहिजे. हजर असते वेळी त्यांने संघाच्या सर्व सभास चेअरमन झाले पाहिजे. जेव्हा तो गैरहजर असेल तेव्हा हजर असलेल्या सभासदांनी आपल्या पैकी एकास त्या सभेकरिता चेअरमन निवडले पाहिजे. चेअरमन यास सभासद या नात्याने असणाऱ्या मता खेरीज समान मता प्रसंगी एक निर्णायक मत देण्याचा अधिकार राहील.

३) वार्षिक साधारण सभेत निवडलेली पंचसमितीने दुसरी पंच समिती निवडली जाई पर्यंत काम चालवील. पंचसमितीचे कामाचे मुदतीत मृत्युमुळे अगर इतर कारणामुळे पंचसमितीत रिकाम्या होणाऱ्या जागा तिच्या बहुमताने भरल्या जातील.

४) पंचसमितीस संघाचा पोटनियमानुसार व संघाच्या सभाचा ठराव मताने केलेल्या सुचनेनुसार संघाचे काम चालविण्यास पूर्ण अधिकार राहील. कामाची व्यवस्था करण्यासाठी पंचसमितीस जितक्या सभा भरविणे जरूर असेल तितक्या भरवाव्यात.

५) पंचसमितीस अगर तिच्या एक अगर अधिक सभासदांस त्यांचे नेमणूकीचे मुदतीत साधारण सभेच्या २/३ मताधिक्याने काढून टाकता येईल.

६) पंचसमितीच्या सभासदांस ज्या बाबतीत त्यांच्या व्यक्तीशः हितसंबंध असेल अशा बाबींचा विचार चालु असतांना सभेत हजर राहता येणार नाही किंवा मतदान करता येणार नाही.

७) पंचसमितीस योग्य वाटेल असे कारण दाखविल्या वाचुन जर एखाद्या पंचसमितीचा सभासद लागोपाठ होणाऱ्या तीन सभाना गैरहजर राहील तो पंचसमितीच्या सभासदांतुन कमी झाला असे समजण्यात येईल.

८) पंचसमितीस पंचसमितीचा सभासद यांचा नेमणूकीचे वेळी काही दोष असल्याचे पाठीमागुन नजरेस आले. तरी पंचसमितीने अगर पंचसमितीचा सभासद यांना त्याने त्यावेळी केली जाणारी सर्व कामे जणू काही ती पंचसमिती अगर तो सभासद यांची नेमणूक योग्यच झाली असे समजून कायदेशीर धरली जातील.

९) सदरच्या पोट-नियमाचे विरूध्द केलेल्या सर्व व्यवहाराबद्दल पंचसमितीने सभासद जातीने जबाबदार धरले जातील.

## ३.५. इमारत (Building):-

सुरूवातीस तळोदे तालुका सह. खरेदी-विक्री संघ मर्या. ह्यांचे संस्थेचा आर्थिक व्यवहाराचे स्वरूप अत्यंत मर्यादीत होते. परंतु जस जसा संस्थेच्या विकास होत गेला तसातसा आर्थिक व्यवहारांचे स्वरूप वाढत गेले व कर्मचाऱ्यांची संख्या सुध्दा वाढू लागली त्यामुळे संस्थेचे कार्यालय प्रशस्त व स्वतःचे असावे असे वाटु लागले. संघाचे स्वतंत्र

मालकीची इमारत असावी व संघाचे कार्यालय सर्व सभासद शेतकऱ्यांना सोयीचे असावे असे व्यवस्थापन मंडळाला आवश्यक वाटत होते.

तत्कालीन पंचसमिती व चेअरमन श्री. पुरूषोत्तम नारायण पाटील व व्यवस्थापक श्री . कृष्णा झेंडा माळी ह्यांच्या प्रयत्नाने संघाचे कार्यालय बांधण्याचा निर्णय झाला. व संघाची स्वत: ची इमारत बांधून पूर्ण झाली.

२१ नोव्हेंबर १९८१ रोजी संघाचा इमारतीत प्रवेश कार्यक्रम संपन्न झाला. ह्या कार्यक्रमांचे उद्घाटक मा. खा. चंद्रशेखरजी हे लाभले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान श्री. अण्णासो. पी.के. पाटील ह्यांनी भुषविले होते.

